# अमरावती महानगरपालिका, अमरावती
## बाजार व परवाना विभाग
## म.न.पा क्षेत्रातील फेरीवाल्यांकडुन दैनिक फी वसुली करीता
## ई-निविदा प्रणाली द्वारे निविदा सुचना – १ (२०२२-२३)

(जा.क्र. 591 दि.29/11/२०२२)

मा.आयुक्त यांचे वतीने अमरावती महानगरपालिकेच्या बाजार व परवाना विभागा मार्फत खालील कामासाठी कंत्राटदाराकडुन ई-निविदा प्रणाली द्वारे ऑनलाईन ई-निविदा मागविण्यात येत आहे.

| अ.क्र | कामाचे नाव | शासकीय मुल्य | बयाणा रक्कम | निविदा फार्मची किमत रुपये | कामाची मुदत |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | ४ | ५ | ६ |
| 1 | अमरावती महानगरपालिका क्षेत्रातील सर्व फेरीवाल्या कडुन दैनिक फी रु.१०/- प्रमाणे फी वसुल करणे व त्यास रितसर पावती देणे | ५२,०७,५००/- | ५२,०७५/- | ११०००/- +१८% GST | १ वर्ष |

| | |
|---|---|
| ई-निविदा दस्ताएवज डाऊनलोड प्रारंभ व दाखल करण्याची सुरवात दिनांक | दि.29/11/२०२२ दु.११:००AM वाजे पासुन |
| ई-निविदा दस्ताएवज डाऊनलोड समाप्त व दाखल करण्याची अंतीम दिंनाक | दि. ७ /12/२०२२ दु.०४:००PM वाजे पर्यंत |
| ई-निविदा उघण्याची दिनांक (Technical) व (Financial) | दि.8 /12/२०२२ दु.०४:००PM वाजता शक्य झाल्यास |
| (Financial) ई-निविदा उघडण्याची दिनांक व वेळ Mail व Sms व्दारे कळविण्यात येईल. | |

निविदेच्या अटी व शर्ती महाराष्ट्र शासनाच्या http://www.mahatenders.gov.in संकेतस्थळावर सविस्तर निविदा सुचना पाहवयास मिळेल.

अधिक्षक
बाजार व परवाना
महानगरपालिका,अमरावती

उपायुक्त (सा)
महानगरपालिका,अमरावती

c:\users\lenovo\documents\tender form.docx

Scanned with CamScanner

**अमरावती महानगरपालिका,अमरावती.**
**बाजार व परवाना विभाग**
**फेरीवाल्यांकडुन दैनिक फी वसुलीसाठी द्यावयाच्या कंत्राटाच्या शर्ती व अटी**

1. अमरावती महानगरपालिका क्षेत्रातील सर्व फेरीवाल्यांकडुन (फिरते विक्रेता,गुजऱ्या व हातगाडी वर व्यवसाय करणारे) प्रतिदिन रु.10/- दैनिक फी प्रती फेरीवाला करुन वसुली करीता एक वर्षा करीता कंत्राट द्यावयाचा आहे.
2. कंत्राटाचा कालावधी करारनामा केल्याचे तारखेपासुन एक वर्षा करीता राहील.
3. महानगरपालिकेचे थकबाकीदारास हा कंत्राट घेता येणार नाही.
4. निविदाधारकाचे निविदा स्विकृत झाल्यावर निविदा रक्कमचे १६% सुरक्षा रक्कम मनपात जमा करावे लागेल. त्याशिवाय करारनामा करण्यातयेणार नाही व कार्यारंभ आदेश देण्यात येणार नाही.
5. दैनिक वसुलीचा कंत्राट महत्तम निविदाधाकास दिल्या जाईल. या करीता शासकीय आधारभुत मुल्य रु.५२,०७,५००/- राहील.
6. निविदा स्विकृत झाल्यास १६% सुरक्षा रक्कम व ऑफर मुल्याचे एक माहचा रक्कम निविदाधारकास एकमुस्त त्वरीत भारावीं लागेल. त्याशिवाय करारनामा करण्यात येणार नाही तसेच कार्यरंभ आदेश देण्यात येणार नाही. उर्वरीत रक्कम हि दर माह १ ते ५ तारीखच्या अगोदर भरावी लागेल अन्यथा प्रती दिवस १०००/- रुपये प्रमाणे दंड आकरणात येईल.
7. कोणतीही नोंदणी कृत संस्था यांना सुरक्षा रक्कम मध्ये सुट मिळण्या करीता त्याबाबतचा लेखी पत्र संबंधित संस्था / कार्यलयाचा निविदा सोबत सलग्न करणे बंधनकारक राहील त्या शिवाय आर्थिक निविदा उघण्यात येणार नाही किंवा सदर निविदा रद्द करण्यात येईल
8. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मध्ये होणारे वेळोवेळीचे बदलाव अनुसार कंत्राटदारास फी वसुल करावी लागेल. तसेच मनपा अधिकाऱ्यांनी वेळोवेळी दिलेले आदेश व सुचना कंत्राटसारास बंधनकारक राहतील. तसेच शासन नियमानुसार जेकाही करा मध्ये बदलाव होणार ते कंत्राटदाराला कर भरणे बन्धकारक राहील.
9. चिल्लर वसुली करीता पावती पुस्तक मनपा ने ठरवुन दिलेल्या स्वरुपाचे व किमतीचे राहिल. त्या पावती पुस्तक करीता लागणारा खर्च कंत्राटदाराला स्वखर्चाने करावे लागेल.
10. मनपाचे अधिकारी फी वसुलीचे तपासणी करीता आल्यास कंत्राटदारास या संदर्भात सर्व ते सहकार्य कारावे लागेल.
11. कंत्राटदारास सदर चिल्लर वसुली कंत्राट दुसऱ्या व्यक्तीस देता येणार नाही. अटीचा भंग झाल्यास सदर कंत्राट रद्द करण्यात येईल व होणाऱ्या नुकसान व परिणामास कंत्राटदार जवाबदार राहिल.
12. साथीचे रोगामुळे किंवा काहीही आकस्मीक कारणामुळे दैनंदिन बाजार बंद झाल्यास त्याची जबाबदारी महानगरपालिकेची राहणार नाहि.अशा स्थतीत फी वसुलीची संपुर्ण रक्कम कंत्राटदारास अदा करावी लागेल.
13. फी वसुलीची पावती पुस्तके स्वत: छपाई करावी लागतील. ती मा.आयुक्त यांचे द्वारे प्राधिकृत केलेले सक्षम अधिकाऱ्या कडुन प्रमाणीत करुन वापरावी लागतील. पावती पुस्तके संपल्या नंतर डुप्लीकेट किंवा काउंतर महानगरपालिका कार्यालयात जमा करावी लागतील.शर्ती माहचा वसुली व पावती पुस्तकचा आराखडा चार्ट बाजार व परवाना विभागात जमा करावे लागेल.
14. ठरलेल्या शुल्क पेक्षा जास्त शुल्क घेवु नये तथा चिल्लर वसुली पावती शुल्क शिवाय इतर कोणताही मोबदला हॉकर्सकडुन घेवु नये. याबाबत तक्रार आल्यास संदर करार रद्द करण्याचा अधिकार मा.आयुक्त यांना राहील.

Scanned with CamScanner

बाजार व परवाना

15. मनपा क्षेत्रातील संबंधित फेरीवाल्यास पावती देतांना त्यांवर फेरीवाल्यांचे संपुर्ण नांव, झोन क्र. मोबाईल ध्वनी क्र. इत्यादी संपुर्ण माहिती सदर पावतीमध्ये नमुद करावी लागेल, व त्याचे अभिलेख संगणक प्रणाली द्वारे तयार करुन दर माह बाजार व परवाना विभागात जमा करावे.
16. कंत्राटदाराने कामावर नियुक्त केलेल्या संपुर्ण कर्मचारी वर्गाची जवाबदारी ही कंत्राटदाराची राहील, या संबधात मनपाचे कोणताही जवाबदारी बंधनकारक राहणार नाही.
17. कंत्राटदाराला कामावर नियुक्त केलेल्या संपुर्ण कर्मचारीला गणवेश व ओळखपत्र असणे बन्धकारक आहे, गणवेशामध्ये नसल्यास व ओळखपत्र नसल्यास, आवश्यकतेनुसार स्टाफ नसल्यास मनपाच्या संबंधित विभागाचे सुचनांचे पालन न केल्यास व फेरीवाला / ग्राहकासोबत गैरवर्तन केल्यास एक आठवडा प्रतीदिवस रुपये १०० व त्यानंतर रुपये २००/- दंड आकरण्यात येईल.
18. चिल्लर वसुली कंत्राटचे वसुली करीता कामावर नियुक्त केलेले कर्मचारी यांचा चरित्र संपन्न व्यक्तीस यांनी नियुक्ती करावी लागेलतसेच त्या संबंधात आवश्यक संपुर्ण माहिती मनपास देण्यात यावी व . संबंधास सांशक असल्यास सदर मनपास सदर व्यक्तीच्या नियुक्ती व्यक्तीस नियुक्ती न करण्यास सुचना देण्याचा अधिकार मनपास राहील. तसेच नियुक्तीपुर्वी पोलीस विभागामार्फे व्यक्तीच्या चरित्राबाबत पडताळणी करुन घ्यावी व त्या कर्मचाऱ्याबाबत माहिती पोलीस विभागास वेळोवेळी दयावी लागेल.
19. कंत्राटदारास दोन जमानतदार असे धावे लागतील की ज्यांची अचल संपती मनपाचे हद्दीत असेल व त्या बाबतीत लेखी पुरावा अशी संपत्ती असल्याचा दाखला धावा लागेल.
20. कंत्राट घेणाऱ्याचे नावाने जर महापालिका हद्दीत अचल संपत्ती असेल तर त्यांचे विवरण त्यास धावे लागेल.
21. निविदा स्विकृत झाल्यास ऑफर मुल्यावर शासनाचे नियमानुसार वस्तु व सेवाकर कंत्राटदाराने दर माह भरणे बंधनकारक राहील
22. वरील संपुर्ण कंत्राटाचे कोणत्याही एका अटीचा किंवा कराराचे अटीचा कंत्राटदाराकडुन भंग झाल्यास विना नोटीसीने कोणतीही पुर्व सुचना न देता सदई कंत्राट रद्द करुन मा.आयुक्त महानगरपालिका अमरावती यांना मनपा कर्मचाऱ्या कडुन किंवा अन्य कंत्राटदाराकडुन वसुली करण्याचा अधिकार राहील. व त्या बावत कंत्राटदाराची कोणतीही तक्रार ऐकली जाणार नाही यामुळे महानगपालिकेचे होणारे नुकसानीस कंत्राटदार जबाबदार राहील, तसेच मनपाचे धोरणानुसार ठेका (कंत्राट) रद्द करण्यात येईल.
23. कोणतीही निविदा स्विकारणे अथवा नाकारण्याचे अंतिम अधिकार मा.आयुक्त यांचे राहतील.
24. कुठलाही वाद असल्यास मा.आयुक्त सदर वाद एकण्यास सक्षम असतील व आयुक्तांचा निर्णय अंतिम असेल. आयुक्तांचे सर्व अधिकार राखुन ठेवन्यात आले आहे.

सदर निविदा दाखल करण्याकरीता खालील कागदपत्रे अनिवार्य आहेत.

- कंत्राटदाराचे ओळखपत्रची छायाप्रत उदा. आधार कार्ड, निवडणुक कार्ड.
- आयकर अदा केल्या बाबत चे प्रमाणपत्र.( सन 2019-20,2020-21,2021-22)
- मुंबई दुकाने व संस्था अधिनियम 1948 अंतर्गत आस्थापनेचे नोंदणी प्रमाणपत्राची छायाप्रत.
- मनपा अंतर्गत बाजार व परवानाचे अनुज्ञप्ती प्रमाणपत्राची छायाप्रत.
- जी.एस.टी नोंदणी प्रमाणपत्र.
- संस्था असल्यास नोंदणी प्रमाणपत्राची छायाप्रत व तिन वर्षाचा आडीत रिपोर्ट व सुरक्षा रक्कम बाबतचा लेखी पुरावा सोबत सलग्न करावे.
- वसुली करीता लागणारे कामगार करीता कामगार कायदा अंतर्गत भा.नि.नि नोंदणी, कामगार परवाना सोबत सलग्न करावे.
- पॅन कार्डची छायाप्रत

Scanned with CamScanner

➢ संबंधित कामाचा अनुभव प्रमाणपत्र. (नसल्यास वरील सादर केलेले कागद पत्र प्रमाणे सदर कंत्राट देण्यात येईल).

अधिक्षक
बाजार व परवाना
महानगरपालिका,अमरावती

उपायुक्त (सा)
महानगरपालिका,अमरावती

अमरावती महानगरपालिका
बाजार
व
परवाना
अमरावती

Scanned with CamScanner